**The International Day of the World's Indigenous Peoples 2023 Celebrated**

# बेईमान व्यवस्थेमुळे आदिवासींच्या सर्वांगीण विकासात बाधा - डॉ. शांताराम बडगुजर



**जळगाव** : बेईमान व्यवस्थेमुळे आदिवासींच्या सर्वांगीण विकासात बाधा निर्माण झाली असल्याचे प्रतिपादन डॉ. शांताराम बडगुजर यांनी केले. नूतन मराठा महाविद्यालयात समाजशास्त्र विभाग आणि हिंदी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक आदिवासी दिवस साजरा करण्यात आला ते याप्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पर्यवक्षक डॉ. के. बी. पाटील उपस्थित होते. तर हिंदी विभाग प्रमुख डॉ. राहुल संदानशिव हे देखील व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करुन करण्यात आली. प्रास्तविक समाजशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. साहेब पडलवार यांनी केले.

आपण आपल्या घराला रंगरंगोटी करत असताना एखादी भिंत तशीच राहू दिली तर कसं वाटेल असा सवाल उपस्थित करुन आदिवासी समाज हा आपल्या देशाचा चेहरा आहे तो बेरंग राहू नये यासाठी पुढारलेल्या समाजाने आणि व्यवस्थेने प्रयत्न केले पाहिजेत असे प्रतिपादन प्रा.डॉ.के.बी. पाटील यांनी अध्यक्षीय मनोगतात केले. सूत्रसंचलन हिंदी विभागाच्या प्रा मुक्ति अग्रवाल यांनी तर आभार प्रा. डॉ. राहुल संदानशिव यांनी मानले. यशस्वीतेसाठी प्रा.डॉ.डी. आर. चव्हाण यांनी कामकाज पाहिले. याप्रसंगी प्राध्यापक, प्राध्यापिका आणि विद्यार्थी उपस्थित होते.